प्रेस नोट दिनांक २८/०३/२०२५

श्री.प्रदिप प्रितम केदार, जिल्हा पुरवठा अधिकारी,(वर्ग १), जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयत्र. रत्नागिरी, ता. जि.रत्नागिरी यांना तक्रारदार यांचेकडुन लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांनी ताब्यात घेतले.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | रत्नागिरी युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक / पोलीस ठाणे | रत्नागिरी शहर पोलीस ठाणे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.प्रदिप प्रितम केदार, जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय रत्नागिरी, ता.जि.रत्नागिरी (वर्ग १) |
| मागणी केलेली लाच रक्कम | १५,०००/- रुपये (पंधरा हजार रुपये) |
| स्विकारलेली लाच रक्कम | तडजोडीअंती ११,०००/- रुपये (अकरा हजार रुपये ) |
| थोडक्यात हकिगत | तक्रारदार श्री.कांबळे यांचे अखत्यारित असणारे संगमेश्वर येथील धान्य गोदाम यास मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी, तहसिलदार संगमेश्वर यांनी दिनांक २२/०३/२०२५ रोजी भेट दिली होती. त्यावेळी तक्रारदार हे गैरहजर होते, तसेच लोकसेवक जिल्हा पुरवठा अधिकारी, श्री.केदार यांनी तक्रारदार यांचे अखत्यारीतील गोदामाची तपासणी करुन धान्य साठयामध्ये तफावत असल्याचे सांगुन तसेच गैरहजर असल्याचे सांगुन तक्रारदार यास सांगुन त्याबाबत वरीष्ठ कार्यालयास नकारात्मक अहवाल न पाठविण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रुपयांचे लाचेची मागणी केली. त्यानुसार लोकसेवक केदार यांनी दिनांक २८/०३/२०२५ रोजी तडजोडी अंती ११,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले व मागणी केलेली लाच रक्कम जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे तक्रारदार यांचेकडुन स्विकारल्यानंतर लोकसेवक केदार यांना पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले आहे. |

| | | |
|---|---|---|
| मार्गदर्शन अधिकारी | १) | मा.श्री.शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे. |
| | २) | मा.श्री.संजय गोवीलकर अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे. |
| | ३) | मा.श्री.सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे. |
| | ४) | मा. श्री अविनाश पाटील, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी घटक |

ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमाकावर संपर्क साधावा.

**Toll Free No** :- 1064
**Telephone No** :- 02352/222893, Mobile No. 7588941247, 9870474535
**Office email** :- acbratnagiri@gmail.com
**Website** :- www.acbmaharastra.gov.in
**Mobile App** :- www.acbmaharastra.net
**Facebook Page** :- www.facebook.com/MaharastraACB

पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते रत्नागिरी